नि.फौ.ख.क्र. ०१/२०२३ CNR No. MHCH150000022023
सरकार वि. विनोद निशाणी ३७

## अभियोग पक्षातर्फे साक्षिदार क्रमांक ०६ चे शपथेवर बयान सरु

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | मधुकर भाऊजी आत्राम, |
| माझे वय | :– | ५४ वर्ष, |
| माझा व्यवसाय | :– | सहा. फौज. ब.न.२१७३ |
| राहणार | :– | पो.ठा. सिंदेवाही |

### साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. सी. आर. भोई यांच्या मार्फत

१) घटनेवेळी मी नवरगाव पोलीस चौकी येथे कार्यरत होतो. घटना नवरगाव येथील असल्यामुळे तपास माझ्याकडे आला. तपासदरम्यान मी घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३८** देण्यात येते. त्यानंतर मी आजुबाजुला चोरी करणारा आरोपी कोण असु शकते या संदर्भात माहिती घेतली. मुखबीरकडुन मला खबर मिळाली की, आरोपी विनोद हा बॅटरी घेऊन गेला असावा. त्यावरुन आरोपीला ताब्यात घेतले. त्याने विचारपुस करुन गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी क्र. १ ने तपासा दरम्यान गुन्ह्यातील बॅटरी व इन्व्हर्टर हे आरोपी क्र. २ ला विकल्याचे सांगितले. आरोपी क्र. १ ला घेऊन आरोपी क्र. २ च्या घरी गेलो. आरोपीच्या घराची घर झडती घेतली असता घराच्या बाजुला असलेल्या वाड्यामध्ये ईन्व्हर्टर व बॅटरी मिळाली. त्या वाड्यामध्ये त्याचे शेतीउपयोगी साहित्य सुध्दा ठेवले होते. तेथे दोन पंचासमक्ष पंचनामा कार्यवाही करुन जप्त केले. सदर मुद्देमाल पोलीस ठाणे, मोहरर यांच्याकडे जमा केला. आता मला जप्तीपंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, पंचाची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३९** देण्यात येते. आरोपीच्या विरोधात भरपुर पुरावा मिळुन आल्यामुळे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. मुद्देमाल मी पाहिल्यास ओळखु शकतो. मी आरोपींना ओळखतो. आज एक आरोपी न्यायालयात हजर आहे.

### सरतपास संपला.

### साक्षीदाराचा उलटतपास आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री. डी. बी. निकुरे यांच्या मार्फत.

२. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला मुखबीरकडुन माहिती मिळाली होती व त्याप्रमाणे आरोपीने माझ्याकडे कबुली दिली आणि जप्ती पंचनामा निशाणी क्र. ३९ प्रमाणे आरोपी क्र. २ च्या

घराच्या बाजुला असलेल्या वाड्यामधुन त्या वस्तु जप्त केल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने गुन्ह्याची कबुली दिली होती हे मीखोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने ईन्व्हर्टर व बॅटरी आरोपी क्र. २ ला विकल्या होत्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.** **फेरतपास नाही.**

दिनांक १७/०४/२०२६.

सा.वा.दा.ब.अ.क.के.

PANDURANG ANKUSH GHOTE
Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.04.17 14:54:25 +0530

(श्री. पा. अ. घोटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सिंदेवाही, जि. चंद्रपुर.

श्रवणोत्तर स्विकृत,

PANDURANG ANKUSH GHOTE
Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.04.17 14:54:31 +0530

(श्री. पा. अ. घोटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सिंदेवाही, जि. चंद्रपुर.